पुढारी शहर-जिल्हा कोल्हापूर, शुक्रवार, १३ फेब्रुवारी २०२६

# विवेकानंद महाविद्यालयात राष्ट्रीय विवेकानंद महोत्सवाचे १६ फेब्रुवारीपासून आयोजन

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी विवेकानंद महाविद्यालयाच्या वतीने १६ व १७ फेब्रुवारी दरम्यान 'विवेकानंद महोत्सव : शोध चैतन्याचा' या राष्ट्रीय महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. उपक्रमामध्ये पहिल्या दिवसी अभिवाचन, आयडीयाथॉन, रील फ्लिक्स, डान्स मॅजिक स्पर्धा होणार आहेत. स्पर्धांसाठी रोख पारितोषिके विजेत्यांना मिळणार आहेत. दुसऱ्या दिवसी दि. १७ फेब्रुवारी रोजी विवेकानंद कॉलेजमधील विद्यार्थी, विद्यार्थिनींसाठी मिस्टर अॅण्ड मिस विवेकानंद स्पर्धा होईल. तसेच, आजी-माजी विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक कलाकौशल्यास वाव देण्यासाठी स्टुडंटस् एक्स्पो होणार आहे. विद्यार्थ्यांनी यात सहभाग घ्यावा, असे आवाहन प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, आय.क्यु.ए.सी. व महोत्स्वाच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी केले आहे.